राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.५५/का.५, दि७६डिसेंबर, २०१६ सोबतचे
सहपत्र-४

# भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०१७

सोडत प्रक्रिया, महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०१६ अनुसार कराव्याची आहे. त्यानुसार सोडत प्रक्रियेबाबत थोडक्यात मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे आहेत :-

(१) प्रभाग क्र. १५ व २२ मध्ये तीन जागा आहेत. त्यामुळे प्रथम या दोन प्रभागांपैकी कोणत्या प्रभागामध्ये महिलांच्या दोन जागा राहतील याची सोडत काढण्यात यावी.

(२) त्यानंतर अनुसूचित जातीकरिता आरक्षित असलेल्या जागांमधून अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित होणारे प्रभाग सोडतीने ठरविण्यात यावेत.

(३) अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही फक्त १ जागा आरक्षित होत असून मागील सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आगामी निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जमाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित राहील.

(४) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता एकूण २४ जागा आरक्षित करावयाच्या आहेत. त्यापैकी २३ जागा राज्य निवडणूक आयोगाने सदर पत्रासोबतच्या विवरणपत्र १ मध्ये नेमून दिलेल्या आहेत. उर्वरित एक जागा, विवरणपत्र १ मधील रिमार्क्स (रकाना क्र.१६) या रकान्यात “D” असे नमूद केलेल्या १७ प्रभागांमधील “ब” या जागेच्या चिठ्ठया घेऊन त्या चिठ्ठयांमधून सोडतीने निश्चित करण्यात यावी.

(५) वरील अनुक्रमांक ४ येथील सोडतीनंतर ज्या प्रभागामध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या दोन जागा होतील त्या जागांपैकी एक जागा (“ब” जागा) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांकरिता थेट आरक्षित होईल.

(६) त्यानंतर ज्या प्रभागांमध्ये एक किंवा अधिक जागा एकतर अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा दोन्हीकरिता राखीव असतील, परंतु त्या जागा त्या प्रवर्गातील

महिलांसाठी राखीव नसतील तर अशा प्रभागांतील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची जागा महिलांकरिता थेट राखून ठेवण्यात येईल.

(७) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता एकूण १२ जागा आरक्षित करावयाच्या आहेत. त्यापैकी काही जागा वरील अनुक्रमांक ५ व ६ नुसार थेट नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित होतील.

(८) त्यामुळे वरील अनुक्रमांक ५ व ६ येथील प्रभाग वगळून उर्वरित प्रभागांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांमधून महिलांकरिता आरक्षित करावयाच्या उर्वरित जागांची सोडत काढण्यात यावी.

(९) अ) ही सोडत काढल्यानंतर ज्या चार सदस्यांच्या प्रभागांमध्ये २ जागा महिलांकरिता आरक्षित झालेल्या नाहीत. त्या प्रभागात ते प्रमाण पूर्ण करण्याकरिता आवश्यक असलेल्या प्रमाणात सर्वसाधारण महिलांच्या जागा नेमून देण्यात याव्यात.

ब) तसेच अनुक्रमांक १ येथे नमूद केल्यानुसार ज्या तीन सदस्यांच्या प्रभागामध्ये यथास्थिती एक अथवा दोन जागा महिलांकरिता आरक्षित झालेल्या नाहीत त्या प्रभागात ते प्रमाण पूर्ण करण्याकरिता आवश्यक असलेल्या प्रमाणात सर्वसाधारण महिलांच्या जागा नेमून देण्यात याव्यात. असे करताना सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित असलेल्या सर्व ३० जागांचे वाटप होईल.

(N. J. Wagle)
Under Secretary
State Election Commission, Maharashtra
1st Floor, New Administrative Building
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk
Mumbai 400 032